पुण्य नगरी

# आदर्श महिला पतसंस्थेकडून सायबर सुरक्षेचे धडे

**वडगाव आनंद : प्रतिनिधी**

आळेफाटा (ता.जुन्नर) येथील आदर्श महिला नागरी पतसंस्था यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन साईलीला हॉल येथे करण्यात आले. या सभेस तब्बल ६५० ते ७०० सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या विशेष सभेत बी.जे. महाविद्यालय व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या प्रकल्पांतर्गत महाविद्यालयातील निवड झालेले



२० सायबर वॉरियर्स यांनी सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी सभासदांच्या मोबाईलमध्ये अँटी फ्रॉड ॲप डाऊनलोड करून त्याचा उपयोग समजावून सांगितला.

कार्यक्रमात ॲक्टिव्हिटी संचालक ऋतू नेहरकर यांनी सर्व उपस्थितांना सामूहिक सायबर सुरक्षेची शपथ दिली. मीडिया डायरेक्टर सोयब शेख,प्रेसिडेंट साक्षी नेहरकर यांनी मार्गदर्शन केले.

या सभेला भास्कर बांगर,महादेव वाघ,गुलाब नेहरकर,पप्पूशेठ हाडवळे आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे, बी.जे. महाविद्यालयाचे व क्विक हिल फाउंडेशनचे या उपक्रमाबद्दल विशेष कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, उपाध्यक्ष सौरभ डोके, मानद सचिव अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे व सर्व संचालक मंडळाने उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख नूतन जोशी, प्रा. रितेश खंडागळे व प्राध्यापकांच्या सहकार्याने करण्यात आले होते.

Pimpri Chinchwad Edition
Aug 19, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

गोपीनाथ शिंदे
9960842023